Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- II FEBRUARY 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# भारतातील उच्च शिक्षणासमोरील आव्हाने आणि संधी

डॉ.गोरोबा तुकाराम खुरपे
प्राचार्य ,जयक्रांती अध्यापक महाविदयालय ,
लातूर

राधेशाम नंदकिशोर कुमठेकर
संशोधक विद्यार्थी
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ
नांदेड

प्राचीन काळापासून शिक्षण हा एक जीवनाचा आवश्यक संस्कार बनला आहे. आपण केलेल्या भौतिक प्रगतीमध्ये कुठलाच माणूस समाधानी नसतो, सातत्याने त्याच्या गरजा , आकांक्षा, अपेक्षा ह्या वाढतच असतात. आजपर्यंत जगातील ज्या काही नवनिर्मिती झाल्याआहेत त्या सर्व माणसाच्या बुध्दीच्या आविष्कारामुळेच आणि केवळ शिक्षणामुळेच. शिक्षणामधून व्यक्ती विकास, व्यक्ती विकासातून समाज विकास आणि समाज विकासातून राष्ट्राचा विकास होत असतो, ही एक दिर्घकालीन प्रक्रिया असते. शिक्षणामुळे सुजाण आणि जबाबदार नागरिक निर्माण होतात म्हणजेच प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासाची समान संधी ही शिक्षणातूनच निर्माण होते. विकासाच्या या मार्गाचा अवलंब करण्यासाठीच शिक्षणशाखांचा विस्तार आज झालेला आपल्याला दिसतो. आज शिक्षण प्रक्रियेतही अनेक बदल झाले आहेत आणि होत आहेत. जागतिककीकरणामुळे शिक्षणव्यवस्थेमध्ये अविरतपणे होणारी स्थित्यंतरे शिक्षणाच्या एकूणच प्रक्रियेला नव संजीवनी देणारी ठरत आहेत. सद्यस्थितीतील बदलांची नांदी ही खरे तर जागतिकीकरणापासूनच सुरु झालेली आहे. आज लोकसंख्येचा, माहिती तंत्रज्ञानाचा, अपेक्षांचा तसेच ज्ञानाचा प्रस्फोट झालेला आहे. जागतिकीकरणाच्या प्रवाहामध्ये सर्वात मुलभूत असणारी आपली भारतीय शिक्षण प्रणाली देखील जागतिक शिक्षण व्यवस्थेशी सुसंगत असणे क्रमप्राप्त झाले आहे. 21 व्या शतकात जागतिककीकरणाने भारतीय शिक्षणात अनेक बदल होत आहेत. खाजगी संस्थामध्ये प्रचंड स्पर्धा निर्माण झाली आहे. त्यामुळे साचेबध्द पुस्तकी अभ्यासाच्या घोकमपट्टीवर आज शिक्षण चालू आहे. केवळ पौसा आणि नफा याभोवती केंद्रीत होताना शिक्षण दिसत आहे. सव्वाशे कोटींचा आपला देश , मोठया लोकसंख्येचा , फायद्याचा आहे असं आपल्याला वाटतं मात्र याचा पुरेपूर लाभ सा•या जगाला होण्यासाठी मानवी संसाधनाचे रुपांतर मानवी भांडवलामध्ये होणे अत्यंत गरजेचे होत चालले आहे. भारतात जवळपास 32000 महाविदयालये आहेत ज्यामध्ये जवळ जवळ दीड कोटी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. इतकी प्रचंड शिक्षण व्यवस्था सुदृढ वाटत आहे. पण ती कुपोषित होण्याची शक्यता निर्माण होत आहे. या व्यवस्थेपुढे जागतिकीकरणामुळे अनेक आव्हाने निर्माण होत आहेत. या अनुषंगाने भारतीय उच्च शिक्षणासमोरील आव्हाने आणि संधी यासंदर्भात या संशोधनातून आढावा घेण्यात आला आहे.

परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. त्याला अनुसरुन समाजातील कोणतीही संस्था स्थिर असत नाही. याला अपवाद शिक्षण संस्था सुध्दा नाही.

भारतीय शिक्षणामध्येही वेगाने परिवर्तन होत आहे. सर्वात महत्वाचा बदल म्हणजे शिक्षण हे व्यवसाय आहे हे आता मान्य पावत आहे. भारतात परदेशी विद्यापीठांना मुक्त प्रवेश करण्याला मान्यता मिळाली आणि भारतीय विद्यापीठांना परदेशात आपल्या शाखा उघडता येतील. खाजगी शिक्षण संस्थानी त्याच्या अभ्यासक्रमाच्या गरजेनुसार शिक्षक नेमावयाचे असतात. आज राज्य शासन व केंद्र शासन उच्च शिक्षणाची पूर्णत: जबाबदारी स्विकारायला तयार नाहीत. राज्यशासनाच्या मते प्राथमिक शिक्षण देणे एवढीच आमची जबाबदारी आहे. खाजगी क्षेत्राचा उच्च शिक्षणामधील प्रभाव वाढतोच आहे. नवीन कॉलेज व विद्यापीठांच्या निर्मितीच्या प्रस्तावांमध्ये लक्षणीय वाढ होत आहे. तर दुस·या बाजूने प्रस्थापित कॉलेजात पुरेशा गुणवत्तेच्या अभावी विद्यार्थी पाठ फिरवू लागल्याचे चित्र आहे. विद्यापीठातील शिक्षण हे अधिक व्यवहार्य, प्रसंगोचित व कौशल्यविकास संबंधीत करण्याची गरज सर्वच क्षेत्रामधून पुढे येत आहे. एका बाजूने शिक्षण क्षेत्राची बाजारीकरणाकडे प्रक्रिया सुरु असतानाच उद्योग जगताचे लक्षही आता या क्षेत्राकडे वळले आहे. अनेक उद्योजकांनी खाजगी विद्यापीठांची स्थापना केलेली आहे.

खाजगी संस्थाच्या अभिमत विद्यापीठांच्या कारभारावर नियंत्रण आणण्यासाठी केंद्र सरकारने विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत नवीन नियमावली जाहिर केली आहे. महत्वाच्या अभ्यासक्रमासाठी केंद्रीय पातळीवर प्रवेश परीक्षा राबवून या क्षेत्रामधील अवैध प्रक्रियावर अंकुश आणला जात आहे. यामुळे गुणवत्तेच्या निकषावर समाजाच्या सर्व स्तरामधील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी कोणत्याही देणग्या न देता उपलब्ध होऊ शकणार आहेत. यामुळे शिक्षण क्षेत्रामधील राजकारणाचा व काळया पौशाचा ओघही कमी होईल.

भारतीय शिक्षणपध्दती ही अध्यात्म व विज्ञान यांची सांगड असलेली शिक्षणव्यवस्था आहे. त्यामुळे भारतातील शिक्षणाला गुणवत्तेचे शिक्षण असे म्हटले जाते. न्यूयॉर्क सारख्या देशात सुध्दा आज प्रत्येक तिसरा व्यक्ती डॉक्टर किंवा अभियंता जो भारतीय आहे.

शिक्षण क्षेत्रात आता स्पर्धेचे युग सुरु झाले आहे. उदयोगधंदे विकास, दळणवळण सुविधा, अत्याधुनिक साधने , बदलती जीवन शौली यामुळे शिक्षण क्षेत्रात विविध शाखांचा जन्म झाला. परंतु या सर्व शाखेतील शिक्षणाची उपलब्धता सरकारी महाविद्यालयात होणे शक्य नसल्यामुळे व वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या शौक्षणिक प्रवेश गरजा पूर्ण होण्याकरिता, विविध खाजगी शौक्षणिक संस्थांचा उगम झाला. तसेच विविध विदेशी विद्यापीठाने भारतामध्ये आपले ठाण मांडले. मुक्त अर्थव्यवस्था पध्दतीमुळे उच्च शिक्षणाची रचना बदलत आहे. हे बदल आपल्या राष्ट्राला ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था म्हणून ओळख प्राप्त करुन देत आहे

**तक्ता क्र.1**

**भारतातील विद्यापीठ व महाविद्यालयांची संख्यात्मक वाढ** *(1950-1951 ते 2010-2011)*

| अ.क्र. | वर्ष | विद्यापीठे | महाविद्यालये |
|---|---|---|---|
| 1 | 1950-51 | 27 | 578 |
| 2 | 1960-61 | 45 | 1819 |
| 3 | 1970-71 | 82 | 3277 |
| 4 | 1980-81 | 110 | 6963 |
| 5 | 1990-91 | 184 | 5748 |
| 6 | 2000-01 | 272 | 11146 |
| 7 | 2009-10 | 525 | 25951 |
| 8 | 2010-11 | 556 | 31324 |

संदर्भ: युजीसी युनोस्को ग्लोबल एज्युकेशन 2010

वरील तक्त्यामध्ये भारतातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांची 1950-51 ते 2010-11 या कालावधीतील संख्यात्मक वाढ दिली आहे.

**तक्ता क्र.2**

**भारतातील उच्च शिक्षणातील विद्यार्थी प्रवेश दरातील वाढ** *(1990 ते 2010)*

| अ.क्र. | वर्ष | विद्यार्थी प्रवेश (मिलीयनमध्ये) |
|---|---|---|
| 1 | 1990-91 | 4.9 |
| 2 | 1995-96 | 6.6 |
| 3 | 2000-01 | 8.4 |
| 4 | 2005-06 | 11 |
| 5 | 2008-09 | 13.8 |
| 6 | 2009-10 | 14.6 |

संदर्भ: युजीसी युनोस्को ग्लोबल एज्युकेशन 2010

वरील तक्त्यामध्ये भारतातील मागील दोन दशकात उच्च शिक्षणातील विद्याश्र्यांचा प्रवेश दर 4.9 मिलीयन वरुन 14.6 मिलीयन इतका झाल्याने वरील तक्त्यावरुन दिसून येते. म्हणजेच गेल्या तीन दशकात झालेली वाढ तीनपट आहे.

भारतामध्ये शिक्षणातील बदलाच्या संदर्भात नोंदवता येण्यासारखी बाब म्हणजे एका बाजूला जरी गुणवत्तेचा आग्रह धरला जात असला तरी दुसऱ्या बाजूने मात्र केवळ राजकीय व अशैक्षणिक हेतूने एकूण महाविद्यालयापैकी केवळ दहा टक्के महाविद्यालयात इंटरनेट सुविधा उपलब्ध आहेत. गेल्या पंचवीस वर्षामध्ये उच्च शिक्षणात बरेच परिवर्तन आलेले आहे. त्यामध्ये विद्याश्र्याची वाढती संख्या, उत्तरदायित्वाची मागणी, शिक्षणाच्या सामाजिक व आर्थिक भूमिकेसंबंधी पुनर्विचार इ. बाबी त्यात महत्वाच्या आहेत. मुक्त विद्यापीठे, इंटरनेटचे शैक्षणिक कार्यक्रम, दुरस्थ विद्यापीठांचे अभ्यासक्रम, परदेशी शैक्षणिक ग्राहक, शिक्षण संस्था यांनी आपले अभ्यासक्रम परदेशी चालविणे, शिक्षकांची एका देशातुन इतर देशात देवाण घेवाण इ. बाबीमुळे जागतिक पातळीवर शैक्षणिक बाजारपेठ निर्माण झाली. यात शिक्षक व शिक्षण संस्था हे विक्रते आणि विद्यार्थी हे ग्राहक अशी यात योजना आहे. ही बाब भारताच्या शिक्षणाला वेगळे वळण देणारी आहे. शिक्षणातील हे सर्वात व्यापक परिवर्तन आहे असे म्हणता येईल.

या काळात भारतीय उच्च शिक्षणात भांडवलाचा अभाव, तंत्रज्ञानाचा अभाव आहे हे मान्य करुन समाजातील दानशूर व श्रीमंत व्यक्तीने , उद्योजकांनी , स्वयंसेवी संस्थांनी आणि परदेशी गुंतवणूकदारांनी पुढे यावे आणि भारतीय शिक्षणासमोरील आव्हाने दूर करण्यास प्रत्यक्ष भरीव मदत करावी , समाजातील गरीब लोकांपर्यंत देशातल्या सर्वात शेवटच्या घटकापर्यंत ही मदत पोहोचेल आणि गुणवत्तेचे संवर्धन होईल याकडे लक्ष दयावे. तरच जागतिकीकरणाच्या भारतीय शिक्षणातील प्रवेशाच्या गोड आणि सुमधूर फलितांचा भावी पिढीला दूरगामी आस्वाद घेता येईल.

**संदर्भ ग्रंथ :**

1. डॉ. सुखदेव थोरात , भारतातील उच्च शिक्षण , योजना मासिक वर्ष 34 अंक 10 वा मे.2007
2. डॉ. अरुण निगवेकर , उच्चशिक्षणात सुधारणा हव्यात, दै. सकाळ बुधवार 29 जुलै 2009
3. डॉ. अरुंधती जोशी , भारतीय शिक्षणपध्दती
4. डॉ. गणेश शेटकर, भारतीय शिक्षण प्रणालीचा इतिहास
5. डॉ. मीनल नरवणे, भारतीय शिक्षण आयोग व समित्या
6. युजीसी युनोस्को ग्लोबल एज्युकेशन 2010
7. मासिक शिक्षण संक्रमण
8. कुमार केतकर , बदलते विश्व
9. डॉ. सुरेश करंदीकर, उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण